डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संलग्नित

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

# वार्षिक अहवाल

२०१७-२०१८

प्राचार्य

डॉ.एस.आर.टकले

कार्यक्रमाधिकारी

डॉ.पी.एम.कल्याणकर

Scanned by CamScanner

# आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

# २०१७-२०१८

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल |
| --- | --- |
| १ | महाविद्यालयीन स्तरावरील उपक्रम |
| २ | समाजस्तरावरील उपक्रम |
| ३ | विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा |
| ४ | स्वंयनिर्वाही अभ्यासक्रम<br>(Self Financed Certificate Courses): |
| ५ | कृतीयूक्त फोटो |
| ६ | वर्तमानपत्रातील प्रसिद्धी |
| ७ | विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेची निमंत्रण पत्रिका |


Scanned by CamScanner

## १. महाविद्यालयीन स्तरावरील उपक्रम :

### १.१ महाआरोग्य शिबिरात सहकार्य :

महाराष्ट्र राज्य विधानसभेचे अध्यक्ष, मा. हरिभाऊ बागडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिनांक १८ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालय परिसरात आयोजित केलेल्या महाआरोग्य तपासणी शिबिरात स्वंयसेवकांनी नोंदणी विभाग, रुग्णांना व्यवस्थित तपासणी केंद्रापर्यंत पोहचवणे, कचरा उचलणे इत्यादी कामे करून शिबरात सहकार्य केले.

### १.२ विद्यापीठ वर्धापन दिनी व्याख्यान :

दि. २३ ऑगस्ट २०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठाच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून प्रा. राजू पोपळघट (विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग राजर्षी शाहू महाविद्यालय, औरंगाबाद) यांनी "समाज व आजचे शिक्षण" या विषयावर मार्गदर्शन केले. आजच्या शिक्षणाने समाजमनात सकारात्मक बदल आणि आत्मविश्वास निर्माण करावा, जेणेकरून समाजपरिवर्तन घडून येण्यास मदत होईल असे मत मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले होते. शिक्षणाने माणूस स्वत: आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाला पाहिजे असे मत त्यांनी मांडले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. सपना सोळुंके या विद्यार्थीनोने केले. प्रास्ताविक डॉ. पांडुरंग कल्याणकर यानी तर आभार प्रा. विजय पांडे यांनी मानले.

### १.३ विद्यापीठस्तरीय कार्यशाळेतील सहभाग :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाने दि.२/८/२०१७ रोजी आयोजित केलेल्या प्राचार्यांच्या बैठकीस महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.एस.आर. टकले हे उपस्थित राहिले. तसेच दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी या विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत डॉ.पांडुरंग कल्याणकर यांनी सहभाग घेतला. तर दि. २६ सप्टेंबर २०१७ रोजी आयोजित केलेल्या स्वंयसेवकांच्या कार्यशाळेत श्री. कृष्णा लहाने व राजू खरात यांनी सहभाग घेतला.



Scanned by CamScanner

### १.४ प्रजासत्ताक दिनी व्याख्यान :

दि. २६ जानेवारी २०१८ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आजीवन शिक्षण विभागाच्या वतीने "भारतीय राज्यघटना" या विषयावर डॉ.राजेंद्र नामदेवराव मोरे (विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी) यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी ते म्हणाले की, आपण सार्वभौम म्हणजे परकीय सत्तेपासून मुक्त झाल्यानंतर आपण राज्यघटना स्विकारली. आपण धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्था स्विकारली आहे. संसदीय लोकशाहीचा आपण स्विकार केला आहे. भारतीय राज्यघटनेतील तत्त्वांना डावलून राज्यकारभार केला जाणार नाही याची खबरदारी आपण घेतली पाहिजे, असे मत त्यांनी मांडले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले म्हणाले की, आज देशात विषमता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ३३ टक्के लोक अर्धपोटी झोपतात. तेव्हा उच्च शिक्षितांनी या संदर्भातील कारणांचा शोध घ्यावा.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. मंगल सुरभैय्ये व सुमय्या सय्यद स्वंयसेविकांनी केले, पाहुण्यांचा परिचय कु. ज्योती उदये या स्वंयसेविकेने परिचय करून दिला तर प्रा. नितीन माळेगावकर यांनी आभार मानले.

## २. समाजस्तरावरील उपक्रम :

### १) स्वातंत्र्यदिनी व्याख्यान :

दि.१५ ऑगस्ट २०१७ रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री येथील डॉ. युवराज गहिराव यांचे व्याख्यान लहूजी साळवे संस्कार केंद्रावर ठेवण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, स्वातंत्र्य संग्रामात समाजातील सर्वच घटकातील लोकांनी योगदान दिले.

अनेकांच्या बलिदानातून देशाला स्वातंत्र्य मिळाले याची जाणीव आपण ठेवावी. प्रत्येकाने स्वतंत्र देशाचा नागरिक म्हणून जगत असताना स्वतःचा चांगुलपणा जपला



Scanned by CamScanner

पाहिजे. यावेळी संस्कार केंद्रावरील बालकांनी राष्ट्रभक्तीपर गितांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. ज्योती उदयेने केले. प्रास्ताविक डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले तर आभार प्रा.नितीन माळेगावकर यांनी मानले.

**महाविद्यालयीन परिसर स्वच्छता :**

दि. १५ ऑगस्ट २०१७ रोजी लहूजी साळवे संस्कार केंद्रावरील कार्यक्रम संपल्यानंतर स्वंयसेवक, प्राचार्य व प्राध्यापकांनी महाविद्यालयाच्या इमारतीच्या पाठीमागील भागात उगवलेले गाजर गवत उपटून काढले व अन्य काडी कचरा वेचून महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली.

**२.२ आरोग्य तपासणी शिबिर :**

दि. ४ सप्टेंबर २०१७ रोजी आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने मौजे दरेगाव (दरी) ता. फुलंब्री येथे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरासाठी फुलंब्री येथील शासकीय रुग्णालयाचे अधिक्षक डॉ.संतोष देशपांडे यांनी वैद्यकीय सल्ला व औषधी पुरविली. या शिबिरात डॉ.विजय काथार यांनी उत्तम आरोग्यासाठी आहार, विहार व विचार चांगले असणे गरजेचे असल्याचे मत मांडले. यावेळी डॉ.विजय काथार व डॉ. शैलेजा पाटील यांनी रुग्णांची तपासणी केली. एकूण ६५ रुग्णांची तपासणी केली. यावेळी वृद्ध व महिला रुग्णांची मोठ्या प्रमाणावर तपासणी करून औषधी देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याणकर पांडुरंग यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.बाबासाहेब लहाने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ.संजय पांचाळ, श्री. रत्नाकर जाधव व स्वंयसेवक राजू खरात यांनी सहकार्य केले.



Scanned by CamScanner

**२.३ विद्यापीठ नामविस्तार दिनी समाजस्तरावर व्याख्यान :**

दि. १४ जानेवारी २०१८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाच्या नामविस्तार दिनाचे औचित्य साधून फुलंब्री गावातील लहूजी साळवे संस्कार केंद्रावर "बाबासाहेबांचे शिक्षण विषयक विचार" या विषयावर प्रा. पी.व्ही. ठाकरे यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते. त्यांनी बाबासाहेबांनी आपल्या जीवनात शिक्षणाला कसे प्राधान्य दिले, हे सांगितले. तसेच समाजातील तळागाळातील लोकांचा विकास करण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शैक्षणिक संस्था उभारण्यावर भर दिला. असे मत त्यांनी मांडले.

यावेळी श्री. रमेश तुपे या माजी विद्यार्थ्यांने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एस. आर. टकले होते. कु. मंगल सुरभैय्ये या विद्यार्थिनीने सुत्रसंचालन केले. प्रास्ताविक डॉ.कल्याणकर पी.एम. यांनी तर आभार प्रा. नितीन माळेगावकर यांनी मानले. कार्यक्रमानंतर तिळगुळाचे वाटप करण्यात आले.

## ३. विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा :

**कालावधी : दि. ३० व ३१ जानेवारी २०१८**

आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने दि. ३० व ३१ जानेवारी २०१८ या कालावधीत विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

**दि. ३० जानेवारी २०१८**

**३.१ उद्घाटन सत्र :**

यावेळी उद्घाटक म्हणून डॉ. संजय मून (संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद) हे होते. तर बीजभाषक म्हणून विद्यार्थी



Scanned by CamScanner

विकास विभागाचे संचालक डॉ. मुस्तजीब अहमद खान हे होते, अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते.

कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलत असताना डॉ. संजय मून म्हणाले की, देशाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातंर्गत हा विभाग काम करतो. शिक्षणातून मनुष्यबळ विकासाचे काम झाले पाहिजे. शिक्षणातून विकसित झालेले व्यक्तीमत्त्व समाजाच्या विकासासाठी वापरात आले पाहिजे.

**बीजभाषण - मुलाखत तंत्र :**

डॉ. मुस्तजीब अहमद खान यांनी कार्यक्रमाचे बीजभाषण करतांना मुलाखत तंत्र या विषयावर मार्गदर्शन केले. प्रोजेक्टच्या सहाय्याने विविध चित्रफितीच्या माध्यमातून त्यांनी हा विषय स्पष्ट केला. मुलाखत काराने जेवढे विचाराले तेवढे सांगावे, अतिउत्साही होऊ नये, मुलाखत द्यावयाच्या ठिकाणाची अगोदर व्यवस्थित माहिती घ्यावी, इत्यादी विविध बारकावे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. कार्यशाळेचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी.एम. यांनी केले.

**३.२ दुसरे सत्र - संभाषण कौशल्य :**

संभाषण कौशल्य या विषयावर बोलताना डॉ. उत्तम आंभोरे (प्राध्यापक, इंग्रजी विभाग, डॉ. बा.आं.म.वि. औरंगाबाद.) म्हणाले की, व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातही संभाषण कौशल्याचे महत्त्व आहे. आपल्या बोलण्यावर व शब्दाबद्दल आत्मविश्वास असावा. शब्दावर पकड असावी. प्रत्येक व्यक्तीला किमान आपल्या मातृभाषेतून तरी चांगले संभाषण करता येणे गरजेचे आहे.

**३.३ सत्र तिसरे - लेखन कौशल्य :**

तिसऱ्या सत्रात लेखन कौशल्य विषयावर डॉ. अश्विन रांजणीकर यांनी मार्गदर्शन केले. तर अध्यक्षीय समारोप डॉ. महेश थोरात यांनी केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. लक्ष्मीकांत ढेपले यांनी केले.



Scanned by CamScanner

दि. ३१ जानेवारी २०१८.

**३.४ सत्र चौथे - महिलांना पोलीस क्षेत्रातील रोजगार संधी :**

महिलांना पोलीस क्षेत्रातील रोजगार संधी या विषयावर बोलताना सौ. अर्चना पाटील (साहाय्यक पोलीस निरीक्षण, वडोद बाजार) यांनी असे मत मांडले की, पोलीस दलातील सेवेबाबत विचार करताना सर्वात खालच्या पदावरील नोकरीचा विचार न करता थोड्यावरच्या पदावरील नोकरीचा विचार करावा. त्यांनी स्वत: या पोलीस सेवेत प्रवेश करताना कसा अभ्यास केला व शारीरिक चाचणीत यशस्वी होण्यासाठी त्यांना घ्यावे लागलेले प्रशिक्षण याची माहिती दिली.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना फुलंब्री येथील पोलीस निरीक्षक श्री बापूसाहेब महाजन म्हणाले की, विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून तयारी करावी. अभ्यासाचे अधिक दडपण न घेता अभ्यास करावा. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. ज्योती उदये या स्वंय सेविकेने केले प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश प्रा. पांडुरंग कल्याणकर यांनी सांगितला तर आभार डॉ. संदीप जगताप यांनी मानले.

**३.५ सत्र पाचवे - समाजकार्ये विषयातील रोजगार संधी :**

समाजकार्ये विषयातील रोजगार संधी या विषयावर बोलताना श्री. मनोज गाडेकर (विभागीय प्रत्यारोपन समन्वयक, एम.जी.एम., औरंगाबाद) यांनी सामाजिक कार्यातून पदवी व पदव्यूत्तर शिक्षण घेतल्यानंतर विविध शासकीय क्षेत्रात उपलब्ध होणाऱ्या रोजगार संधीची माहिती दिली. वर्तमान धावपळीच्या जीवनात समुपदेशकाचे महत्त्व वाढत असल्याचे मत त्यांनी मांडले. यावेळी अवयवदानाचे महत्त्व स्पष्ट करून अवयवदान करून आपण अनेक जनांचे कसे प्राण वाचवू शकतो याची माहिती त्यांनी दिली. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी केला. सुत्रसंचलन कु. मंगल सुरभैय्ये या स्वंयसेविकेने केले तर आभार डॉ. मंजुषा नळगिरकर यांनी मानले.



Scanned by CamScanner

**३.६ सत्र सहावे - उद्योजकीय गुणांचा विकास :**

उद्योजकीय गुणांचा विकास या विषयावर बोलताना प्रा. अविनाश धोत्रे यांनी असे मत मांडले की, व्यक्तीने स्वत:च्या उद्योगाचे स्वप्न निर्माण करून ते प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करावा.

**३.७ सत्र सातवे - नौकरी संदर्भातील बायोडाटा :**

नौकरी संदर्भातील बायोडाटा या विषयावर बोलताना प्रा. विजय पांडे यांनी आजच्या संगणकाच्या युगात बायोडाटा करणे किती सहज व सोपे झाले आहे हे सांगितले.

## ४. स्वंयनिर्वाही अभ्यासक्रम (Self Financed Certificate Courses):

शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे मंजुर केलेल्या स्वंयनिर्वाही अभ्यासक्रमांपैकी सर्टिफिकेट कोर्स एन कम्यूनिकेटिव्ह इंग्लिश व विक्री प्रतिनिधी हे दोन स्वंयनिर्वाही अभ्यासक्रम महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण विभागाने चालविले. यातील कम्यूनिकेटिव्ह इंग्लिश अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. आश्विन रांजणीकर यांनी जबाबदारी सांभाळली. तर विक्री प्रतिनिधी अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. महेश थोरात व प्रा. नितीन माळेगावकर यांनी काम केले. या वर्षात विक्री प्रतिनिधी या अभ्यासक्रमास १५ व कम्यूनिकेटिव्ह इंग्लिश या अभ्यासक्रमास १३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

**कार्यक्रमाधिकारी**
**डॉ. पी. एम. कल्याणकर**

**प्राचार्य**
**डॉ. एस. [illegible] रकले**
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय
फुलंब्री, जि. औरंगाबाद



Scanned by CamScanner

Affiliated to

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

&

Pandit Dindayal Upadhyay Education Society's

**SHRI SANT SAVTA MALI GRAMIN MAHAVIDYALAYA,**

**PHULAMBRI**

Tq. Phulambri, Dist. Aurangabad

# Department of Lifelong Learning and Extension

# Annual Report

# 2017-2018

**Principal**

**Dr. S. R. Takle**

**Programme Officer**

**Dr. Kalyankar P.M.**

Pandit Dindyal Upadhaya Education Society's

Shri Sant Savta Mali Gramin Mahavidyalaya, Phulambri

Tq. Phulambri, Dist. Aurangabad



Scanned by CamScanner

# Lifelong Learning and Extension Department

## Annual Report

## 2017-2018

Lifelong Learning and Extension Department of our college has been organized various programme at Community level and College level during 2017-18. Department have also taken two days Students Counseling and Career Guidance workshop. As well as during this year department have been running two Self Finance Certificates including Seals Representative and Certificate Course in Communicative English.

## Extension Activity at College Level:

### 1.1) Participations in the Maha Arogya Shibir ( Mega Health camp) :

Health camp has been organized on 18th August 2017 in the college Campus by Baratiya Janta Parti on the occasion of birth Day of Hon. Haribhau Bagada ( Speaker of Legislative Assembly of Government of Maharashtra), Volunteers has participated in the health camp, they were helped in the registration, cleanliness of campus, they have also helped the patients for reaching to right doctor room.

### 1.2) Special Lecture on the Occasion of University Foundation Day:

Department has organized Special lecture on 23rd August, 2017 on the occasion of University Foundation Day Shri Raju Popaloghat ( Assistant Professor and Head of Sociology, Rajarshi Shau Mahavidyalaya , Pathri) in the college campus. He has delivered speech on **Society and Current Education System**. He pointed out that education must create positive attitude and confidence among the learner so he may able to transform the society.

Concluding remark of programme made by Principal, Dr. S. R. Takle. Introductory speech gave by Dr. Kalyankar P.M. and Associate Prof. Vijay Pande delivered gratitude of this programme. Volunteer Sapna Salunke has anchored the programme.



Scanned by CamScanner

### 1.3) Participation in University Level Training Programmes:

Department of Lifelong Learning and Extension of Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad has arranged training programme for Principal, Programme Officers, Volunteers on following dates our collage participation in those training are follow:

| Sr. No. | Training | Date | Participant |
|---|---|---|---|
| 01 | For College Principals | 2/08/2017 | Principal, Dr. S. R.Takle |
| 01 | For Programme Officers | 08/09/2017 | Dr. Kalyankar P.M. |
| 02 | For Volunteers | 26/09/2017 | Krushna Lahane (BASY)<br>Raju Kharat (BAFY) |

### 1.4) Organized Lecture on the occasion of Republic Day:

Guest lecturer was organized on the occasion of Republic Day. It was on the Indian Constitution, lecturer delivered by Dr. Rajendra More (Dept. Of Political Science, Sant Ramdas Mahavidyalaya, Ghansawangi). He pointed out that Indian Constitution is in the form of written and extensive, constitution have given certain right and duties, accepted parliamentary system. People must cautious about, Is the government working according to principals of Indian Constitution?

Concluding remark of programme made by Principal, Dr. S. R. Takle. Volunteer Joti Uday and Summaya Saiyad have anchored the programme. Introductory speech given by Dr. Kalyankar P.M. and Assistant Prof. Nitin Malegaonkar delivered gratitude of this programme.

## 2) Extension Activity at Community Level:

### 2.1 Arranged Lecture on the occasion of Independent Day :

On the occasion of 15$^{th}$ August 2017 department has organized Guest lecturer in slum area of **Phulambri village at Lhuji Salve Bal Sanskar Kendra. Dr. Youraj** Gahirrao was the chief guest of that occasion the topic of his lecturer was Freedom **Fight of India.** He stated that many peoples devoted their live in the freedom, there were various peoples who had devoted their wealth and life for the freedom but their name has not noted in the India's freedom history. India got freedom on the devotion of various peoples, so we must remember their devotion.



Scanned by CamScanner

Principal Dr S. R. Takle was chairperson of the programme. Dr. P.M. Kalyankar made introduction of programme, volunteers Joti Udye has anchored the programme, and vote of thanks by Assistant Professor Nitin Malegaonkar .

**2.2 Health Awareness and Health Checkup Camp:**

Department has organized Health Awareness and Health Checkup programme at Daregaon Dari village. The camp was organized on 04th September 2017. Department has received cooperation from Rural Hospital of Phulambri to arrange this camp. Dr. Vijay Kathar has advice to take enough food and rest for healthy life. He has also advices people on individual and local sanitation. On the occasion Dr. Shelaja Patil was presented. In this health camp 65 patient have been caked by doctors and medical disbursed to them.

The chairperson of this programme was Principal, Dr. S.R. Takle. Dr. Kalyankar P.M. introduced the programme. Shri. Babasaheb Lahane was anchored the progrmme. Other faculty member including Assistant Prof. Sanjay Panchal, Ratnakar Jadhav, and volunteer Raju Kharat were involved in the organization of the programme.

**2.3 Arranged Lecture on the occasion of University Name Expansions Day:**

14th January 2018 celebrated as name extension day of Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.. On this eve of this day department organized Lecture of Assistant Prof. P.V. Thakre ( Rajarshi Shau Mahavidyalaya, Pathri ). Guest of the programme delivered speech on **Thought of Dr. B.R. Ambedkar on Education**.

The chairperson of this programme was Principal, Dr. S.R. Takle. Dr. Kalyankar P.M. introduced the programme, vote of thanks by Assistant Prof. Nitin Malegaonkar. In this programme Tilgul has been distributed to the presenters.

## 3) Student Counseling and Carrier Guidance Camp

Department had organized two days' workshop on 30th & 31st January 2018. The workshop was on Student Counseling and Carrier Guidance. Following session were included in this two days' workshop.



Scanned by CamScanner

## Date: 30th January 2018

### 3.1 Inaugurations Function:

Workshop inaugurated on 30th January 2018 by Dr. Sanjay Moon (Coordinator, Lifelong Learning & Extension Department, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad). He stated that, this department runs for development of people and empowered them. The concept of development not relied on the development and extension of geographical area but the development of the people of that country. On that occasion Dr. Mustajib Ahmed Khan, Director,Student Development, Dr.B.A.M.U., Aurangabad gave key note on **Interview Skill.** He has delivered lecturer with the help of power point presentation and video clips. He stated that before going to interview, we must develop self-confidence. We must know the required qualification of that particular post. Interview facer must keep mind his silent.

The session was chaired by the Principal, Dr. S.R. Takle and introduced by Dr. P.M. Kalyankar. The session was encored by volunteers Shri. Lakshimekant Deple.

### 3.2 Second Session: Communicative Skill

In the second session Dr. Uttam Ambhore (Professor, Dept. of English **Dr. B.A.M.U., Aurangabad**) has delivered lecturer on the Communicative Skill. He stated that communicative skill is not only important in political field but also in the industry, social service and in man's daily life too.

### 3.3 Session Third: Writing Skill

Dr. Aswin Ranganikar has delivered lecturer on the writing skill and session is chaired by Dr. Mahesh Thorat.

## Date: 31st January 2018

### 3.4 Fourth Session: Opportunities of Women in Police Sector

In this session Archana Patil (Assistant Police Inspector, Vadodbajar ) has stated that student must think about high level post of the police sector and take effort to achieve the post. She has also expressed his own experience and efforts to achieve her present post.

Shri. Bapu Mahjan has chaired of this session. Dr. Kalyankar P.M. introduced this session. Volunteers Joti Udye has anchored this session and vote of thanks by Assistant Dr. Sandip Jagtap.



Scanned by CamScanner

### 3.5 Fifth Session: Opportunities in Social Works

Shri. Manoj Gadekar (Regional Coordinator. Human Transplant, MJM) has delivered speech on Opportunities in the Social Work. He has given information about the various opportunities for the degree holders of BSW, MSW. Dr Sanjay Panchal has chaired the session. Volunteers Mangal Surbhaiyye has anchored this session and vote of thanks by Associate Professor Dr. Manjusha Nalgirkar.

### 3.6 Sixth Session: Development of entrepreneurs Skill

Assistant Professor, Avinash Dhotre has delivered lecturer on Development of Entrepreneurs Skill. He stated that, see own dream and try to achieve it. Otherwise some else, use you to achieve his dream.

### 3.7 Sixth Session: Valedictory Session – Résumé for Job

Sixth session that is valedictory session of the workshop was arranged on **Resume for Job**. This session was on the guidelines for students regarding how to make Resume Associate Professor, Vijay Pande provided basic details in making Resume.

## 4. Implementation Self financed Certificate Courses

By this department two Self-financed Certificate Courses have been implemented in 2017-18. One is **Certificate course in Communicative English** and another is **Sales Representative**. There have been 13 and 15 students taken admission for these courses respectively. Dr. Ashwin Rajanikar is the coordinator of the Communicative English course. Dr. Mahesh Thoral and Assistant Prof. Nitin Malegaonkar are coordinators of Sales Representative Course.

**Programme Officer**

Dr.P.M. Kalyankar

**Principal**

PRINCIPAL
Shri Sant Savta Mali Gramin Mahavidyalaya,
Phulambri. Ta. Phulambri, Dist. Aurangabad



Scanned by CamScanner

महाविद्यालयस्तरावरील उपक्रम



कृषीदिन महाविद्यालय परिसरात वृक्षरोपन करतांना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले व अन्य प्राध्यापक




कृषीदिन वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

Scanned by CamScanner



मा. हरिभाऊ बागडे (नाना) अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित आरोग्य शिबिरास स्वंयसेवकाचा सहभाग



महाआरोग्य तपासणी शिबिरात स्वंयसेवकाचा सहभाग

Scanned by CamScanner



महाआरोग्य तपासणी शिबिरात स्वंयसेवकाचा सहभाग




महाआरोग्य तपासणी शिबिरात स्वंयसेवकाचा सहभाग

Scanned by CamScanner




विद्यापीठ वर्धपानदिनी मार्गदर्शन करतांना प्रा. राजू पोपळघट




विद्यापीठ वर्धपानदिनी अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले

Scanned by CamScanner



विद्यापीठ वर्धपानदिनी विद्यापीठ गित सादर करतांना डॉ. संजय पांचाळ



विद्यापीठ वर्धपानदिनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. कल्याणकर पी. एम.

Scanned by CamScanner




प्रजासत्ताकदिनी आयोजित कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले



प्रजासत्ताकदिनी भारतीय राज्यघटना या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. राजेंद्र मोरे

Scanned by CamScanner



महाविद्यालयीन परिसराची स्वच्छता करतांना स्वंयसेवक, प्राचार्य व प्राध्यापक



Scanned by CamScanner




दि. १५ ऑगस्ट २०१७ रोजी मार्गदर्शन करतांना डॉ. युवराज गहेरराव



स्वातंत्र्यदिनी देशभक्तीपर गित सादर करतांना लहुजी साळवे संस्कार केंद्रातील विद्यार्थी

Scanned by CamScanner



दरेगाव (दरी) येथे आयोजित आरोग्य तपासणी शिबिराचे सुत्रसंचलन करतांना प्रा. बाबासाहेब लहाने



आरोग्य तपासणी शिबिराचे प्रास्ताविक करतांना डॉ. कल्याणकर पी. एम.

Scanned by CamScanner



आरोग्य तपासणी शिबिरात मार्गदर्शन करतांना डॉ. विजय काथार



आरोग्य तपासणी शिबिरात रूग्णांची तपासणी करतांना डॉ. रविंद्र काथार व डॉ. शैलेजा पाटील

Scanned by CamScanner




आरोग्य तपासणी शिबिरात रूग्णांची तपासणी करतांना डॉ. रविंद्र काथार व डॉ. शैलेजा पाटील




आरोग्य तपासणी शिबिरात रूग्णांची तपासणी करतांना डॉ. रविंद्र काथार व डॉ. शैलेजा पाटील

Scanned by CamScanner



आरोग्य तपासणी शिबिरात रूग्णांची तपासणी करतांना डॉ. विजय काथार



आरोग्य तपासणी शिबिरात शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. विजय काथार

Scanned by CamScanner





आरोग्य तपासणी शिबिरात दरेगाव (दरी) येथील शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी. एम.

Scanned by CamScanner




नामविस्तार दिनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. कल्याणकर पी. एम.




विद्यापीठ नामविस्तारदिनी आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्रा. पी. व्ही. ठाकरे

Scanned by CamScanner




विद्यापीठ नामविस्तारदिनी आपले मनोगत व्यक्त करतांना माजी विद्यार्थी श्री रमेश तुपे




विद्यापीठ नामविस्तार दिनाच्या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले

Scanned by CamScanner



नामविस्तारदिनी लहुजी साळवे संस्कार केंद्रात तिळगुळाचे वाटप करण्यात आले

Scanned by CamScanner

# विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर



दि. ३० व ३१ जानेवारी २०१८ या कालावधीत आयोजित विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिराची सुरूवात प्रार्थनेने करतांना स्वंयसेविका कु. ज्योती उद्ये व कु. मंगल सुरभैय्ये



मार्गदर्शन शिबिराचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करतांना डॉ. संजय मून, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. उत्तम अंभोरे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले

Scanned by CamScanner




मार्गदर्शन शिबिराचे दीपप्रज्वलन करतांना डॉ. मुस्तजीब खान व अन्य मान्यवर



विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिरात सहभागी विद्यार्थी

Scanned by CamScanner




विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे प्रास्ताविक करतांना डॉ. कल्याणकर पी. एम.




मार्गदर्शन शिबिरात उद्‌घाटनपर भाषण करतांना डॉ. संजय मून

Scanned by CamScanner



मार्गदर्शन शिबिरात मुलाखत तंत्र या विषयावर पीपीटीच्या साहाय्याने मार्गदर्शन करतांना

डॉ. मुस्तजीब खान



Scanned by CamScanner



मार्गदर्शन शिबिरात संभाषण कौशल्य या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. उत्तम अंभोरे



दि. ३१ जानेवारी २०१८ रोजी महिलांना पोलीस दलातील संधी या सत्राचे प्रास्ताविक करतांना

डॉ. कल्याणकर पी. एम.

Scanned by CamScanner




मार्गदर्शन शिबिरात महिलांना पोलीस क्षेत्रातील रोजगार संधी या विषयावर मार्गदर्शन करतांना वडोद बाजार येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक सौ. अर्चना पाटील



Scanned by CamScanner



महिलांना पोलीस क्षेत्रातील रोजगार संधी या विषयावर मार्गदर्शन करता सौ. अर्चना पाटील



मार्गदर्शन शिबिरात महिलांना पोलीस क्षेत्रातील संधी या सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना

श्री. बापूसाहेब महाजन (पोलीस निरीक्षक, फुलंब्री)

Scanned by CamScanner




मार्गदर्शन शिबिरात महिलांना पोलीस क्षेत्रातील संधी या सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना

श्री. बापूसाहेब महाजन (पोलीस निरीक्षक, फुलंब्री)




मार्गदर्शन शिबिरात समाजकार्य विषयातील रोजगार संधी या विषयावर मार्गदर्शन करतांना

श्री. मनोज गाडेकर

Scanned by CamScanner



समाजकार्य विषयातील रोजगार संधी या सत्राचा अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. संजय पांचाळ



सत्राचे आभार प्रदर्शन करतांना डॉ. मंजुषा नळगीरकर

Scanned by CamScanner



मार्गदर्शन शिबिरात उद्योजकीय गुणांचा विकास या विषयावर मार्गदर्शन करतांना प्रा. अविनाश धोत्रे



मार्गदर्शन शिबिरात नौकरी संदर्भातील बायोडाटा या विषयावर मार्गदर्शन करतांना प्रा. विजय पांडे

Scanned by CamScanner

Publicity of

Lifelong Learning and Extension Department

2017-18

# जबाबदारी सांभाळत असताना नागरिकांनी जपावा चांगुलपणा

दै. सकाळ - 22/08/2017

## डॉ. युवराज गहेराव : फुलंब्री येथील सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात व्याख्यान

फुलंब्री, ता. २१ (बातमीदार) : स्वतंत्र देशाचा पुरा नागरिक म्हणून वावरताना जर आपल्याला खरोखर असणारी जबाबदारी प्रामाणिकपणे सांभाळावी लागेल. आपली जबाबदारी सांभाळत असताना नागरिक म्हणून आपल्यामध्ये असणारा चांगुलपणा जपावा. तेव्हाच खऱ्या अर्थाने देशाची प्रगती होण्यास मदत होईल. नागरिक म्हणून असणारी जबाबदारीही तेवढ्याच ताकदीने पार पाडावी लागणार आहे, असे प्रतिपादन डॉ. युवराज गहेराव यांनी केले.

येथील सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात मंगळवारी (ता.१५) स्वातंत्र्यदिनी आजीवन शिक्षण व विस्तार विभागातर्फे लहुजी साळवे सेंटर केंद्रात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्री. गहेराव बोलत होते. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महाविद्यालय परिसरातील स्वच्छता स्वयंसेवकांच्या माध्यमातून करण्यात आली. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांनी केला. प्रा. नितीन मालेगावकर यांनी आभार मानले. ज्योती ढंडे यांनी सूत्रसंचालन केले. यासाठी डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी पुढाकार घेतला.



फुलंब्री : सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. युवराज गहेराव. (छायाचित्र : नवनाथ इथापे)

दै. दिव्य मराठी - 24.08.2017

# 'शिक्षणाने समाजात सकारात्मकता'

फुलंब्री । आजच्या शिक्षणाने समाजमनात सकारात्मक बदल आणि आत्मविश्वास निर्माण करायला जेणेकरून समाजपरिवर्तन घडून येण्यास मदत होईल, असे प्रतिपादन राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्रा. राजू पोपळघट यांनी फुलंब्री येथे केले. संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापन दिन विद्यापीठाचा ध्वज फडकावून साजरा करण्यात आला. याप्रसंगी "समाज आणि आजचे शिक्षण' या विषयावर आयोजित व्याख्यानात प्रा. पोपळघट बोलत होते. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. आर. टकले म्हणाले की, शिक्षणाने ताकदीने उभे राहावे, यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा. आभार प्रा. विजय पांडे यांनी मानले. कार्यक्रमाची भूमिका डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी मांडली. सूत्रसंचालन सपना सोळुंके या विद्यार्थिनीने केले.

Scanned by CamScanner

दै. पुण्यनगरी - २५.०३.२०१७

# 'समाजविकासात विद्यापीठाची भूमिका महत्त्वाची'

फुलंब्री/प्रतिनिधी

समाजविकासात विद्यापीठाची भूमिका अतिशय महत्त्वाची असते, असे मत प्रा. पोपळघट यांनी व्यक्त केले. फुलंब्री येथील संत सावता माळी महाविद्यालयात बुधवारी (दि.२२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ५९ वा वर्धापन दिन विद्यापीठाचा ध्वज फडकावून साजरा करण्यात आला. यावेळी ते 'समाज आणि आजचे शिक्षण' या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलत होते. प्रा.पोपळघट म्हणाले की, आजच्या शिक्षणाने समाजमनात सकारात्मक बदल आणि आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. जेणेकरून समाजपरिवर्तन घडून येण्यास मदत होईल. आणि हे झालेले परिवर्तन दीर्घकाळ टिकेल. याचबरोबर शिक्षणाने श्रमप्रतिष्ठेला महत्त्व द्यावे. स्वतःच्या समस्या सोडविता येणारे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे.या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.एस.आर. टकले म्हणाले, जीवनाच्या सर्व अंगाला स्पर्श करणारे शिक्षण हवे. यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा. याकरीता सर्व समाजघटकांनी सहकार्य करावे. प्रमुख पाहुण्यांचे आभार प्रा. विजय पांडे यांनी मानले. कार्यक्रमाची भूमिका डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी मांडली.

Scanned by CamScanner

म.टा. ३१.०१.२०१८

# फुलंब्रीत विद्यार्थी समुपदेशन शिबिर

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री



समुपदेशन शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. संजय मून.

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने (३० जानेवारी व ३१ जानेवारी) दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ. संजय मून यांच्या उपस्थितीत झाले.

यावेळी बोलताना डॉ. संजय मून म्हणाले की, 'मनुष्यबळ विकसित करण्याच्या प्रक्रियेचे नाव शिक्षण आहे. हे मनुष्यबळ विद्यार्थ्यांमधून निर्माण होते. समाजाच्या हिताचे प्रश्न शिक्षणाने सोडविले पाहिजेत. त्यासाठी शिक्षणातून संशोधन साधता आले पाहिजे. यासाठी मी घेतलेले ज्ञान मला समाजापर्यंत घेऊन जाता आले तरच शिक्षणाला अर्थ मिळेल. म्हणून विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या प्रवाहात येऊन त्यातील बदलांविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. तसेच शिक्षणाने समाजामध्ये अंतर्बाह्य बदल घडून येत असतो. या अनुषंगाने मार्गदर्शन त्यांनी केले.

बीजभाषक म्हणून विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. मुस्तजीब खान यांनी मुलाखत तंत्र या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले.

शिबिराच्या दुसऱ्या सत्रात संभाषण कौशल्य या विषयावर डॉ. हसन आंबेरे यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, संभाषण कौशल्य हे आपल्या मातृभाषेतून कोणत्या प्रकारे साधता येते. तसेच सार्वजनिक ठिकाणी बोलायचे असेल तर संभाषण चांगले झाले तर भाषण परिणामकारक होत असते. शब्दांवर पकड असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपल्या बोलण्यावर व शब्दांवरून आत्मविश्वास असावा. त्याशिवाय तुमचे भाषिक कौशल्य विकसित होत नाही. म्हणून भाषिक कौशल्य जागण्यासाठी महत्त्वाचा भाग ठरू शकतो. शिवाय प्रभावी लेखन कौशल्य या विषयावर डॉ. अविनाश रांजणीकर यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप डॉ. महेश चौरे यांनी केला. सूत्रसंचालन ... यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनुष्यबळ विकसित करण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षणः डॉ.मून



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ. संजय मून. छाया : संदीप मोरे

दिव्य मराठी - ३१-०१-२०१८

प्रतिनिधी | फुलंब्री

मनुष्यबळ विकसित करण्याच्या प्रक्रियेचे नाव शिक्षण आहे. आणि हे मनुष्यबळ विद्यार्थ्यांमधून निर्माण होते. समाजाच्या हिताचे प्रश्न शिक्षणाने सोडविले पाहिजेत. त्यासाठी शिक्षणातून संशोधन साधता आले पाहिजे. यासाठी मी घेतलेले ज्ञान मला समाजापर्यंत घेऊन जाता आले तरच शिक्षणाला अर्थ मिळेल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या प्रवाहात येऊन त्यातील बदलांविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करावा, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ.संजय मून यांनी फुलंब्री येथे मंगळवारी आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

फुलंब्रीतील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने ३० ते ३१ जानेवारी असे दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी डॉ.संजय मून बोलत होते.

प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. या वेळी डॉ. मुस्तजीब खान यांनी मुलाखत तंत्र या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. खान म्हणाले की, मुलाखत म्हणजे एकमेकांना जाणून घेण्याची प्रक्रिया होय. मुलाखत देत असताना जेवढे विचारले तेवढे सांगण्याचा प्रयत्न करा. अतिउत्साही होऊन जास्तीची माहिती देण्याची आवश्यकता नाही. तसेच ज्या ठिकाणी मुलाखत द्यायची आहे, त्या ठिकाणी कोणती शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे आणि त्याचा विचार करूनच मुलाखत देण्यास जावे. तसेच स्वतःची क्षमता ओळखूनच मुलाखत द्यावी. प्रसंगी उत्तरे द्यावी लागतील. ज्या ठिकाणी मुलाखत द्यायची आहे त्या ठिकाणची सर्व माहिती मिळवली पाहिजे. यानुसार मुलाखतीमधील बारकावे स्पष्ट केले. अभ्यासकांनी

Scanned by CamScanner

दिव्य मराठी विशेष

फुलंब्री येथे पोलिस निरीक्षक अर्चना पाटील यांचे प्रतिपादन

दिव्य मराठी - 01.02.2018

# आयुष्य उभारणीचा विचार करावा

प्रतिनिधी । फुलंब्री

विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या मागे न धावता अभ्यास आणि स्वतःच्या आयुष्य उभारणीचा विचार करावा, असे प्रतिपादन वडोदबाजार पोलिस ठाण्याच्या सहायक पोलिस निरीक्षक अर्चना पाटील यांनी फुलंब्री येथे केले.

श्री संत सावता माळी महाविद्यालयातील आजिवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने सुरू असलेल्या विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिराच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात महिलांना पोलिस क्षेत्रातील रोजगाराच्या संधी या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्या बोलत होत्या. या सत्राच्या अध्यक्षस्थानी फुलंब्रीचे पोलिस निरीक्षक बापूसाहेब महाजन होते. प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले. पुढे बोलताना पाटील म्हणाल्या की, पैशाने आपण अधिकारी होऊ शकत नाहीत. तर त्यासाठी मेहनत करण्याची तयारी असली पाहिजे. सोशल मीडियाच्या मागे न धावता अभ्यास आणि स्वतःच्या आयुष्य उभारणीचा विचार करावा. अभ्यास कसा करावा व विद्यार्थ्यांनी शिक्षणातून वागुन ध्येय गाठावीत असे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप बापूसाहेब महाजन यांनी केला. बोलत असताना महाजन म्हणाले की, स्पर्धा वाढलेली आहे. याचा विचार करून स्पर्धेत टिकण्यासाठीची मानसिकता विद्यार्थ्यांनी बनवावी. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शासकीय नोकऱ्यांसाठी प्रयत्न केले पाहिजेत. आयुष्याचे एक ध्येय निश्चित करा.

आभार डॉ. संदीप जगताप यांनी मानले. पाचव्या सत्रात समाजकार्य या विषयातील रोजगार संधी या विषयावर एम.जी.एम.चे विभागीय प्रत्यारोपण समन्वयक मनोज गाडेकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. गाडेकर यांनी समाजकार्य व समाजसेवा या संदर्भात महत्त्वाची माहिती दिली. तसेच रोजगाराच्या संधी सांगत असताना महिला व बालकल्याण क्षेत्रात रोजगार मिळतात येतो. त्यासाठी विद्यार्थ्यांनी त्यासंदर्भात माहिती घेऊन समाजसेवेत काम करण्याची आवड स्वतःमध्ये निर्माण करावी.

## विविध विषयांची माहिती

त्याचबरोबर समुपदेशकाची गरज विविध ठिकाणी भासत आहे. याचीही संधी मिळवता येईल. त्याचबरोबर आरोग्य विभाग, औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराच्या संधी, खासगी सामाजिक संस्थांबाबत, नागरी विकास विभाग, अवयवदान, देहदान क्षेत्र इत्यादी. विद्यार्थ्यांना माहिती दिली.

Scanned by CamScanner

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित
व
पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

## विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

दिनांक : ३० ते ३१ जानेवारी २०१८

## निमंत्रण पत्रिका

श्री / श्रीमती ____________________

आपणास कळवीण्यात येते की, आमच्या महाविद्यालयातील आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने दि.३० ते ३१ जानेवारी २०१८ या कालावधीत दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले आहे. तरी आपण या कार्यशाळेत सहभागी व्हावे ही विनंती.

### कार्यशाळेतील उपक्रम

**मंगळवार, दिनांक ३० जानेवारी २०१८**

सत्र पहिले
उद्घाटन सत्र वेळ: सकाळी ११ ते १२.३०
उद्घाटक :- डॉ.संजय मून
(संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग,डॉ.बा.आ.म.वि.)
विषय :- मुलाखत तंत्र
बीजभाषक :- डॉ.मुस्तजीब अहमद खान
(संचालक,विद्यार्थी विकास विभाग,डॉ.बा.आ.म.वि.)
अध्यक्ष:- प्राचार्य,डॉ.एस आर टकले

सत्र दुसरे : वेळ १२:३० ते १:३०
विषय : संभाषण कौशल्य
वक्ते :- डॉ.उत्तम आंभोरे
(प्राध्यापक,इंग्रजी विभाग,डॉ.बा.आ.म.वि.)
अल्पोपहार १.३० ते २.३०

सत्र तिसरे:- वेळ: २.३० ते ४.००
विषय : लेखन कौशल्य,
वक्ते:-डॉ.अश्विन रांजणीकर,
अध्यक्ष : डॉ.महेश थोरात

**बुधवार, दिनांक ३१ जानेवारी २०१८**

सत्र चौथे :- वेळ: ११.०० ते १२.००
विषय :-महिलांना पोलीस क्षेत्रातील रोजगार संधी
वक्त्या :- अर्चना पाटील
(साहाय्यक पोलीस निरीक्षक,बलोदबाजार)
अध्यक्ष :- श्री.बापूसाहेब महाजन
(पोलीस निरीक्षक,फुलंब्री)
सत्र पाचवे:- वेळ:१२.०० ते १.००
विषय :-समाजकार्य या विषयातील रोजगार संधी
वक्ते:-श्री मनोज गाडेकर,अध्यक्ष : डॉ.संजय पांचाळ
अल्पोपहार १.३० ते २.००

सत्र सहावे: वेळ २.००ते ३.००
विषय :-उद्योजकीय गुणांचा विकास
वक्ते:- प्रा.अविनाश धोत्रे,
अध्यक्ष प्रा.नितीन माळेगावकर
समारोप सत्र :- वेळ ३:०० ते.४:००
विषय: नौकरीसंदर्भातील बायोडाटा
वक्ते:-प्रा.विजय पांडे व डॉ.संदीप जगताप,
अध्यक्ष: डॉ.मंजुषा नळगिरकर

विनीत

कार्यक्रमाधिकारी
डॉ.पी.एम.कल्याणकर,९५४५८९९४८४

प्राचार्य
डॉ.एस.आर.टकले

Scanned by CamScanner